पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन,
12 वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
स्थापना- 1986
पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट सातारा
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - 10 वी, 12 वी पास/ नापास व कॉलेजचे विद्यार्थी
* इलेक्ट्रिकल सुपरवायझर * ऑटोमोबाईल टेक्निशियन
* इलेक्ट्रिकल वायरमन * मोटार वायडिंग
* टू-व्हीलर मेकॅनिक * फोर व्हीलर मेकॅनिक
* A.C. मेकॅनिक * वेल्डर / फ्लंबर
* कॉम्प्युटर ऑपरेटर * कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : 9822097071 / 7709509500

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ४२ वा | शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR




# एमपीएससीचा 'पेपरफोड' घोटाळा; सरकारने तरुणांच्या स्वप्नांचा केला चुराडा!

## तरुणांच्या भवितव्याचा बाजार! स्वप्नांवर फिरला बुलडोझर!

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** नीट परीक्षेतील कथित पेपरफुटीच्या प्रकरणानंतर देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट उसळली होती. परीक्षा व्यवस्थेतील गैरप्रकारांमुळे तरुणांच्या भवितव्याशी खेळ होत असल्याचा आरोप करीत विद्यार्थ्यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. त्यानंतर आता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) अखत्यारीतील औषध निरीक्षक पदाच्या भरती परीक्षेतील कथित पेपरफुटीने राज्यातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या विश्वासालाच मोठा धक्का बसला आहे.

अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक पदासाठी २२ मार्च २०२६ रोजी ऑफलाइन स्क्रीनिंग परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेला सुमारे ४४ हजार ५०० उमेदवार बसले होते. त्यानंतर १२ जून रोजी निकाल जाहीर करण्यात आला. त्यामध्ये ५०६ उमेदवार मुलाखतीस पात्र ठरले, तर त्यापैकी ४८५ उमेदवार नियुक्तीसाठी पात्र असल्याचे सांगण्यात आले. मात्र, परीक्षा होण्यापूर्वीच प्रश्नपत्रिका फुटल्याचा आरोप काही उमेदवारांनी आयोगाकडे ई-मेलद्वारे केल्याने संपूर्ण परीक्षा प्रक्रियेवरच संशयाचे सावट निर्माण झाले.

**पेपरफुटीच्या आरोपांनंतर चौकशीला वेग**

या प्रकरणाचा तपास मुंबई पोलिसांकडून करण्यात येत असून, आतापर्यंत एमपीएससीशी संबंधित चार अधिकारी तसेच काही खासगी क्लासचालकांना अटक झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे प्रश्नपत्रिकेची गोपनीयता राखण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणेतीलच व्यक्ती या कथित गैरप्रकारात सहभागी होत्या का, याचा तपास महत्त्वाचा ठरणार आहे.

पेपरफुटीचे आरोप गंभीर असल्याने संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, या निर्णयामुळे परीक्षा देणाऱ्या हजारो उमेदवारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. अनेक विद्यार्थ्यांनी महिनोन्महिने अभ्यास करून परीक्षा दिली होती. काहींनी वयाची मयार्दा, आर्थिक परिस्थिती आणि इतर स्पर्धात्मक परीक्षांच्या संधी लक्षात घेऊन या भरतीकडे मोठ्या अपेक्षेने पाहिले होते. आता परीक्षा रद्द झाल्याने त्यांचे पुढील नियोजन कोलमडण्याची शक्यता आहे.

**'ओल्याबरोबर सुकेही जळते'**

पेपरफुटीचा गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे; मात्र गैरप्रकार करणाऱ्यांमुळे प्रामाणिकपणे परीक्षा देणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांना शिक्षा मिळू नये, अशी मागणी जोर धरत आहे. दोषींवर कारवाई करताना निष्पाप उमेदवारांचे नुकसान कसे टाळता येईल, याचे उत्तर सरकार आणि आयोगाने देणे आवश्यक आहे.

परीक्षा रद्द झाल्यामुळे ज्यांनी प्रामाणिकपणे अभ्यास केला, परीक्षा दिली आणि निकालाची प्रतीक्षा केली, त्यांच्यासाठी ही परिस्थिती मोठ्या मानसिक धक्क्याची ठरली आहे. त्यामुळे नव्याने परीक्षा घेण्याबरोबरच उमेदवारांच्या वयाची मयार्दा, परीक्षा शुल्क आणि इतर संधींबाबत सरकारने विशेष सवलतींचा विचार करावा, अशी मागणी होत आहे.

**एमपीएससीच्या विश्वासार्हतेला तडा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला राज्यातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या तरुणांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. सरकारी सेवेत प्रवेशासाठी लाखो विद्यार्थी या आयोगाच्या परीक्षांवर विश्वास ठेवतात. त्यामुळे प्रश्नपत्रिका सुरक्षित ठेवण्यासारख्या मूलभूत व्यवस्थेतच त्रुटी निर्माण झाल्याचा आरोप समोर आल्यास तो केवळ एका परीक्षेपुरता मर्यादित राहत नाही; तो संपूर्ण परीक्षा व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतो.

प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून तिच्या छपाईपर्यंत, वाहतूक, साठवणूक आणि परीक्षा केंद्रापर्यंत पोहोचेपर्यंत अनेक स्तरांवर गोपनीयता राखली जाते. या साखळीतील नेमक्या कोणत्या टप्प्यावर माहिती बाहेर गेली, कोणाला त्याचा फायदा झाला आणि प्रश्नपत्रिका किती पैशांना विकली गेली, याचा सखोल तपास होणे गरजेचे आहे.

**'पेपर किती रुपयांना विकला गेला?' याचे उत्तर शोधा**

पेपरफुटीच्या प्रकरणात लाखो रुपयांच्या आर्थिक व्यवहारांचे आरोप केले जात आहेत. काही ठिकाणी प्रश्नपत्रिका मोठ्या रकमांना विकल्याचे दावे पुढे आले आहेत. मात्र, या दाव्यांची अधिकृत पुष्टी तपास यंत्रणेकडून होणे आवश्यक आहे.

जर प्रश्नपत्रिका पैशांच्या मोबदल्यात उमेदवारांपर्यंत पोहोचवली गेली असेल, तर हा केवळ परीक्षेतील गैरप्रकार नसून सरकारी भरती प्रक्रियेच्या मुळावर घाव आहे. आर्थिकदृष्ट्या सक्षम उमेदवारांना प्रश्नपत्रिका विकत घेता येते आणि प्रामाणिकपणे अभ्यास करणारा विद्यार्थी मागे पडतो, अशी परिस्थिती निर्माण झाली तर स्पर्धा परीक्षांच्या संपूर्ण व्यवस्थेवरील जनतेचा विश्वासच उडू शकतो.

**'राजकीय हस्तक्षेपा'च्या आरोपांचीही चौकशी व्हावी**

या प्रकरणावरून एमपीएससीच्या नियुक्त्या, आयोगाची स्वायत्तता आणि राजकीय हस्तक्षेप याबाबतही आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. आयोगावरील पदांवर नियुक्त्या करताना पात्रता, तज्ज्ञता आणि प्रशासकीय अनुभव यांना सर्वोच्च प्राधान्य दिले जाते का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

काही राजकीय नेते आणि संघटनांकडून आयोगातील नियुक्त्यांमध्ये राजकीय जवळीक पाहिली जात असल्याचे आरोप केले जात आहेत. काही आरोपींचे राजकीय नेत्यांसोबतचे छायाचित्रे किंवा संबंध असल्याचे दावेही चर्चेत आले आहेत. मात्र, अशा छायाचित्रांवरून कोणाचाही गुन्हेगारी सहभाग सिद्ध होत नाही. त्यामुळे संबंधित व्यक्तींचे आरोपींशी नेमके संबंध काय होते, त्यांनी कोणती भूमिका बजावली आणि त्याचा भरती प्रक्रियेवर काही परिणाम झाला का, याची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे.

**सरकारने जबाबदारी निश्चित करावी**

मुख्यमंत्री तसेच गृहमंत्री म्हणून राज्यातील परीक्षा व्यवस्थेतील अशा गंभीर प्रकरणांची नैतिक आणि प्रशासकीय जबाबदारी सरकारवर येते. पेपरफुटीचे प्रकार घडल्यानंतर केवळ आरोपींना अटक करून प्रकरण संपत नाही. प्रश्नपत्रिका बाहेर जाण्यापासून रोखण्यात कोणत्या पातळीवर अपयश आले, कोणत्या अधिकाऱ्यांनी निष्काळजीपणा केला आणि संपूर्ण यंत्रणेत आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास आवश्यक आहे.

एमपीएससीच्या पदाधिकाऱ्यांची तसेच संबंधित अधिकाऱ्यांची भूमिका तपासाच्या कक्षेत आणावी, अशी मागणी होत आहे. दोष आढळल्यास संबंधितांवर कठोर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. त्याचबरोबर चौकशी निष्पक्षपणे व्हावी यासाठी कोणत्याही राजकीय दबावाला स्थान देऊ नये, अशीही मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे.

**काँग्रेसच्या काळातील उदाहरणे देऊन जबाबदारी झटकता येणार नाही**

पेपरफुटीचे प्रकार यापूर्वीही देशात आणि राज्यात घडले आहेत, हा युक्तिवाद सरकारकडून केला गेला तरी त्यातून सध्याच्या व्यवस्थेची जबाबदारी संपत नाही. एखादा गैरप्रकार पूर्वी झाला होता म्हणून तो आजही सुरू राहणे स्वीकारार्ह ठरू शकत नाही.

सत्तेत असलेल्या सरकारकडून नागरिक आणि विशेषतः तरुण अधिक कठोर अपेक्षा ठेवतात. अनेक वर्षांपासून सरकारी नोकरीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक परीक्षा म्हणजे त्यांच्या आयुष्यातील मोठी संधी असते. त्यामुळे परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता, गोपनीयता आणि विश्वासार्हता राखणे ही सरकारची मूलभूत जबाबदारी आहे.

**विद्यार्थ्यांच्या मानसिक तणावाकडे दुर्लक्ष नको**

स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थी अनेक वर्षे तयारी करतात. ग्रामीण भागातून शहरात येऊन शिक्षण घेणे, महागडी क्लासेसची फी भरणे, राहण्याचा खर्च करणे, कुटुंबाची आर्थिक मदत घेणे आणि त्यानंतर परीक्षा देणे, या संपूर्ण प्रक्रियेत विद्यार्थ्यांची मोठी गुंतवणूक असते.

अशा वेळी पेपरफुटीमुळे परीक्षा रद्द झाल्यास विद्यार्थ्यांवर आर्थिक, मानसिक आणि सामाजिक परिणाम होतो. त्यामुळे सरकारने केवळ पुढील परीक्षा कधी घेणार, एवढे सांगून थांबू नये. उमेदवारांना दिलासा देण्यासाठी ठोस कृती आराखडा जाहीर करावा.

**एमपीएससीला पुन्हा विश्वास मिळवून द्यावा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा म्हणजे राज्यातील तरुणांच्या भवितव्याशी जोडलेली व्यवस्था आहे. या व्यवस्थेतील एखाद्या गैरप्रकारामुळे संपूर्ण आयोगाची प्रतिमा डागाळली जाऊ नये, यासाठी दोषींवर कठोर कारवाई करण्यासोबतच परीक्षा व्यवस्थेत आमूलाग्र सुधारणा करणे आवश्यक आहे.

प्रश्नपत्रिकेची सुरक्षितता, डिजिटल ट्रॅकिंग, गोपनीय कागदपत्रांच्या हाताळणीची जबाबदारी, परीक्षा केंद्रांची सुरक्षा, अधिकाऱ्यांची पार्श्वभूमी तपासणी आणि प्रत्येक टप्प्यावर स्वतंत्र ऑडिट अशा उपाययोजना राबविण्याची गरज आहे.




**'तरुणांच्या स्वप्नांशी खेळ थांबवा'**

सरकारी नोकरी मिळविण्यासाठी वर्षानुवर्षे अभ्यास करणाऱ्या तरुणांच्या स्वप्नांवर वारंवार अशा प्रकारे पाणी फेरले गेले तर त्याचा परिणाम केवळ एका भरतीवर होणार नाही; तर संपूर्ण पिढीच्या मानसिकतेवर होऊ शकतो. त्यामुळे पेपरफुटी करणाऱ्या टोळीचा शोध घेऊन त्यामागील संपूर्ण साखळी उघड करणे, आर्थिक व्यवहारांचा तपास करणे आणि दोषींवर कठोर कारवाई करणे ही काळाची गरज आहे.

औषध निरीक्षक भरती प्रकरणातील प्रत्येक दोषी व्यक्तीपर्यंत तपास पोहोचला पाहिजे. त्याचवेळी निष्पाप विद्यार्थ्यांना या गैरप्रकाराची शिक्षा होऊ नये, यासाठी सरकारने विशेष उपाययोजना कराव्यात. 'पेपरफुटी थांबवा, परीक्षा पारदर्शक करा आणि तरुणांच्या भवितव्याशी खेळ बंद करा', अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## 'नुलुपुन्नमी' निमित्त पूर्व भागात घुमला 'जय मार्कंडेय'चा नारा!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पद्मशाली समाजाचे कुलदैवत मार्कंडेय महामुनींचा रथोत्सव शुक्रवारी मोठ्या भक्तीभावात व उत्साहात साजरा साजरा झाला. यानिमित्त सिद्धेश्वर पेठेतील मार्कंडेय मंदिरात विविध धार्मिक विधी पार पडले. पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत दर्शनासाठी भाविकांची मांदियाळी होती.



रथोत्सवानिमित्त मार्कंडेय मंदिरात पहाटे चारपासून विविध धार्मिक विधींना सुरुवात झाली. याअंतर्गत महर्षी मार्कंडेय मूर्तीस रुद्राभिषेक पूजा मानकरी इंदापुरे व संगा परिवार तसेच प्रमोद कोंडा, प्रवीण कोंडा दांपत्याच्या हस्ते करण्यात आली. तदनंतर चंडीयाग व नवग्रह पूजा शीतल शरद बोरला व सौजन्या अनिल अवधूत दांपत्याच्या हस्ते पार पडली. दरम्यान मार्कंडेय मंदिरावर पद्मध्वजारोहण पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी यांच्या हस्ते करण्यात आले. मार्कंडेय मंदिराचे अर्चक राघवेंद्र आरकाल तसेच पद्मशाली पुरोहित संघाच्या सहकार्याने मंदिरातील धार्मिक विधी पार पडले.

पद्मशाली बांधव नुलुपुन्नमी रोजी मार्कंडेय रथोत्सव साजरा करतात.

कोकणी लोक जसे नारळी पौर्णिमा साजरी करतात, त्या धर्तीवर पद्मशाली बांधव नुलुपुन्नमी साजरी करतात. नुलू म्हणजे सूत आणि पुन्नमी म्हणजे पौर्णिमा. पद्मशाली हे विणकर असल्याने या पौर्णिमेरोजी सुताची पूजा करतात. कापसाच्या राख्या तसेच जानवे परिधान करतात. शुक्रवारी रथोत्सव दिनी मार्कंडेय मंदिरात पहाटे चार वाजल्यापासून ते रात्री उशिरापर्यंत पद्मशाली बांधवांची दर्शनासाठी मोठी रीघ होती. दर्शना वेळी समाज बांधवांकडून 'जय मार्कंडेय...' चा अखंड जयघोष सुरू होता.दर्शन घेतल्यावर भक्तगणांनी मंदिरातील पहिल्या मजल्यावर पुरोहितांकडून जानवे धारण करतानाच कापसाच्या राख्याही बांधून घेतल्या.

दुपारी मंदिरापासून रथाची पूजा सुदर्शन गुंडला यांच्या हस्ते तर मिरवणुकीचा प्रारंभ पोलीस आयुक्त एम. राजकुमार, आ. देवेंद्र कोठे, महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पश्चिम महाराष्ट्र पद्मशाली संघाचे अध्यक्ष डॉ. सूर्यप्रकाश कोठे, नगरसेवक प्रथमेश कोठे, सत्यनारायण गुर्रम, पद्मशाली ज्ञाती संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी, सचिव संतोष सोमा, रमेश कैरमकोंडा, विश्वस्त मुरलीधर आरकाल, रामचंद्र जन्नू, अंबादास बिंगी, राजमहेंद्र कमटम, पद्मशाली युवक संघटनेचे अध्यक्ष ॲड. हेमंतकुमार साका, माजी महापौर (पान 2 वर..)

## सर्वांना विश्वासात घेऊनच पंढरपूरचा विकास आराखडा निश्चित करणार - मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूरच्या विकास आराखड्यात वारकरी, भाविक, स्थानिक नागरिक, व्यापारी, मठाधिपती तसेच लोकप्रतिनिधींच्या सूचना आणि मागण्यांचा समावेश करून सर्वांना विश्वासात घेतच आराखडा अंतिम करण्यात येईल. पंढरपूरचा विकास हा पुढील ५० वर्षांचा विचार करून भाविकांच्या सोयी-सुविधांसह स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्याच्या उद्देशाने केला जात आहे, दरवर्षी पंढरपूरला येणाऱ्या भाविकांची संख्या वाढत असल्याने




संपूर्ण शहराचा एकात्मिक आणि दीर्घकालीन विचार करून नियोजन करणे आवश्यक असल्याचे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

सह्याद्री अतिथीगृह येथे पंढरपूर तिर्थक्षेत्र विकास आराखडा बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, आमदार समाधान आवताडे, जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नागपूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूरचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, पंढरपूरचे उपविभागीय अधिकारी सचिन इथापे, पंढरपूर मंदिर समितीचे उपजिल्हाधिकारी तथा व्यवस्थापक राजेंद्र शेळके, सोलापूरचे उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, सोलापूरचे विधी अधिकारी राजेश अंदाने, पंढरपूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी महेश रोकडे,पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीचे वीर रामकृष्ण महाराज, अभयराजे इंचगांवकर कुलकर्णी, व्यंकटेश नारायण कुलकर्णी, मुकुंद बडवे, वैभव बडवे, गणेश लंके, डॉ. प्राजक्ता बेणारे,चैतन्य बारसोडे, दर्शन महाजन बडवे, मनोजकुमार रामकिसन राठी आणि संजय आवताडे यासह इतर अधिकारी या बैठकीला उपस्थित होते.

**आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून गर्दीचे नियोजन**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पंढरपूरमध्ये भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता भविष्यातील गर्दीचे व्यवस्थापन अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने करणे (पान 2 वर..)

## झेडपीत दहा, पं. समितीत पाच सदस्यांमागे एक स्वीकृत सदस्य

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा परिषद, पंचायत समित्यांमध्ये स्वीकृत सदस्यांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला. नवीन नियमांनुसार जिल्हा परिषदेच्या दहा तर पंचायत समितीच्या पाच सदस्यांच्या मागे एक स्वीकृत सदस्यांची निवड करण्यात येणार आहे.

याला ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दुजोरा दिला.




दरम्यान, यामुळे सोलापूर जिल्हा परिषदेत सात तर पंचायत समितीत २७ स्वीकृत सदस्यांची निवड होणार आहे. स्वीकृत सदस्यपदासाठी संबंधित उमेदवार जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती क्षेत्रातील रहिवासी असणे आवश्यक आहे. तसेच अनुभवी व्यक्तींना प्राधान्य दिले जाणार आहे. सामाजिक क्षेत्रात कार्यरत स्वयंसेवी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना स्वीकृत सदस्य म्हणून संधी मिळू शकते.

**झेडपीतील पक्षीय बलाबल**

भाजप - ३८, राष्ट्रवादी अजित पवार गट - १०, शिंदे शिवसेना - ८, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट - ६,

शेकाप - ३, करमाळा विकास आघाडी - २, पंढरपूर तीर्थक्षेत्र आघाडी - १

**कोणत्या पक्षाला किती स्वीकृत सदस्य लाभणार**

भाजपा - ४, राष्ट्रवादी (अजित पवार गट) -१

शिंदे शिवसेना - १, इतर सर्व पक्ष मिळून - १

> जिल्हा परिषद आणि पंचायत समितीत स्वीकृत सदस्य निवडीविषयी ग्रामविकास विभागाने आदेश काढला आहे. जिल्हा परिषदेत दहा तर पंचायत समितीत पाच सदस्यांमागे एकाची स्वीकृत सदस्य म्हणून निवड करण्यात येईल.
>
> **- जयकुमार गोरे,**
> ग्रामविकास तथा पालकमंत्री

## संपादकीय

# लेकी असुरक्षित अन आपण प्रगतीच्या बाता मारतोय!

महाराष्ट्राच्या पुरोगामी आणि सांस्कृतिक परंपरेला काळिमा फासणारी आणखी एक अत्यंत संतापजनक, तितकीच सुन्न करणारी घटना जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी गावात घडली.

अवघ्या दहा वर्षांच्या निष्पाप, आजारी बालिकेवर अत्यंत अमानुषपणे अत्याचार करून तिचा निर्घृण खून करण्यात आला.

पेरू खाण्याचे आमिष दाखवून एका चिमुकलीचा घात केला जातो आणि गुन्ह्यानंतर तो नराधम पोलिसांसोबत तिच्या शोधमोहिमेत सहभागीही होतो हे अत्यंत घृणास्पद, चीड आणणारे आणि संपूर्ण समाजच आजारी असल्याचे दर्शवणारे लक्षण आहे.

एकीकडे आपण प्रगतीची शिखरे पादाक्रांत करण्याचे दावे करतो, 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' तसेच 'लडकी हूँ लढ सकती हूँ' या सारख्या घोषणा देतो, मुलींकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलावा, मुलींना समाजात वावरताना सुरक्षित वाटावे यासाठी हे सगळे करतो आणि अन्यही दक्षता घेतो. हे करत असतानाच दुसरीकडे आपल्याच समाजात मानवतेला कलंक लावणारी आणि पशूलाही लाजवेल अशी हिंस्र, विकृत प्रवृत्ती राजरोसपणे फिरताना दिसते.

पिंपळवंडी येथील घटना ही केवळ एका गावात घडलेली गुन्हेगारी घटना नाही, तर हा आपल्या सामाजिक मानसिकतेचा आणि कायदा-सुव्यवस्थेच्या दराऱ्याचा झालेला सपशेल पराभव आहे. गुन्हेगारांच्या मनात कायद्याची, पोलिसांची वा समाजाची कसलीही भीती उरलेली नाही हे वारंवार होर्णाया घटनांवरून अधोरेखित होते आहे.

संशयास्पद हालचालींवरून पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आणि पोलिसी खाक्या दाखवताच त्याने कबुली दिली; पण अशा विकृतींचा वेळीच खात्मा करणारी यंत्रणा आपल्याकडे नसेल तर ती कशी विकसित करता येईल यावर काम होणे गरजेचे आहे. पोलिसांकडे बोट दाखवणे प्रत्येक वेळी सुटकेचा मार्ग ठरू शकत नाही. मुळात आरोपी हा काही परग्रहावरून आलेला नसतो. तो याच समाजात वाढलेला व याच समाजाचे अपत्य असते.

मग त्याच्यात अशी इतकी विकृती का निर्माण होते? घरातले संस्कार कमी पडतात की समाजात सगळीकडेच नैतिकतेची भीडभाड न ठेवता एरव्ही जी कृत्ये होत असतात त्यामुळे अशा आरोपींची नजरच मरून जाते आणि त्यांच्या अंगभूत विकृतीला पोषकच वातावरण मिळते, याचाही आता विचार व्हायला हवा. दरवेळी अशी एखादी लांछनास्पद घटना घडली की वर्तमानपत्रांत त्याच्या बातम्या येतात.

त्यावर टीकाटिप्पणी सुरू होते. सर्वसामान्य माणूस आपला रोष व्यक्त करतो, गटांमध्ये चर्चा होऊन संताप व्यक्त केला जातो आणि तत्काळ कारवाईची अपेक्षा केली जाते. टीव्हीवरच्या कार्यक्रमांत ओरडाओरड होते. महिलांच्या हक्कांसाठी लढर्णाया नेत्या आणि सामाजिक कार्यकर्त्या आपली भूमिका पोटतिडकीने मांडतात आणि मग नेहमीप्रमाणेच आश्वासने देत तपास सुरू केला जातो, त्याला गती दिली जाते.

आताही पोलीस प्रशासनाने 15 दिवसांत आरोपपत्र सादर करण्याचे आणि जलदगती न्यायालयात खटला चालवण्याचे आश्वासन दिले आहे. लोकप्रतिनिधी आणि संतप्त ग्रामस्थांनी नराधमाला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे. या मागण्या योग्यच आहेत, किंबहुना अशा राक्षसी कृत्याला फाशीशिवाय दुसरी कोणती शिक्षा असूच शकत नाही. पण, हा न्याय पुन्हा केवळ त्या एका घटनेपुरताच मर्यादित असेल.

नसरापूरच्या घटनेत पोलिसांनी आणि न्यायपालिकेने जी तत्परता आणि कणखरपणा दाखवला त्याकरता त्यांचे अभिनंदन केले गेले, तसेच आताही होईल; पण आता त्यापुढे जाऊन असा विचार करण्याची गरज आहे की या घटना मुळात होऊच नयेत याकरता स्थानिक स्तरावर काही करता येऊ शकते का? कायदे आहेत, तरतुदी कठोर केल्या गेल्या आहेत.

जनमानासातील रोष पाहून आणि एकूणच एक माणूस म्हणून पोलीसही अशा घटना घडल्या की संवेदनशीलपणे ते सगळे हाताळत असतात. ते कोणी कौतुकाची थाप देईल या अपेक्षेने न करता त्यांना घटनेची मनस्वी चीड आली असल्यामुळे तपास भक्कम करत असतात. वकील मंडळीही त्यांचे काम चोखपणे बजावतात हे आपण नसरापूरच्या घटनेत पाहिले. मुद्दा आहे या घटना रोखण्याचा किंवा अशा घटनांच्या मालिकांची साखळी तोडण्याचा. पीडित बालिकेच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार झाले, एका कुटुंबाचा आनंद कायमचा हिरावला गेला.

अगोदरही अशी कितीतरी कुटुंबे होरपळली आहेत. भविष्यात तसे होऊ नये याची जबाबदारी आता उचलावी लागेल. बलात्काराची आणि बालकांवरील अत्याचाराची ही विकृती केवळ शारीरिक वासनेचा विषय उरलेली नाही. हा निष्पापांना चिरडण्याचा अमानुष मार्ग बनला आहे. कपडे, वय किंवा वेळ याने गुन्हेगाराची मानसिकता बदलत नाही, तर स्त्रीला किंवा बालकाला केवळ एक उपभोग्य वस्तू मानण्याच्या सडक्या मानसिकतेतून हे घडते.

इंटरनेटवरील पॉर्नोग्राफीचा बेसुमार मारा, वाढती नशाखोरी आणि कौटुंबिक मूल्यांचा ऱ्हास यामुळे ही विकृत प्रवृत्ती अधिक हिंस्र होत चालली आहे. गृहखात्याने आणि पोलीस प्रशासनाने आता आरोपीला फाशीच्या सुळावर चढवण्यासाठी शक्य ते सगळे केलेच पाहिजे. जर आपण आपल्या घरातील 10 वर्षांच्या लेकीला सुरक्षित ठेवू शकत नसू, तर आपल्या तथाकथित प्रगतीला, संस्कृतीला आणि डिजिटल युगाच्या बातांना काहीही अर्थ उरत नाही.

आता केवळ शोक व्यक्त करून वा समाजमाध्यमांवर मेसेज फिरवून भागणार नाही; तर या विकृतीला मुळापासून उपटून टाकावे लागेल. संस्काराची बीजे पुन्हा पेरावी लागतील. शालेय शिक्षण, सामाजिक कार्यक्रम अगदी नाटक-चित्रपटांसारख्या मनोरंजनपर कार्यक्रमांच्या माध्यमातूनही हा संस्कार येर्णाया पिढ्यांवर बिंबवावा लागेल. तरच मुली समाजात सुरक्षित राहू शकतील.

## महाराष्ट्रात पावसाचा ब्रेक! ऑगस्ट अखेरीस राज्यात ५४ टक्के पावसाची तूट

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** मुंबई पुण्यासह राज्यातील बहुतांश सर्व जिल्ह्यांमध्ये हलक्या श्रावण सरी पडत असल्या तरी अद्यापही मुसळधार पावसाचा अंदाज हवामान वेधशाळेने वर्तवलेला नाही. येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये तुरळक पाऊस होईल मात्र कुठेही मुसळधार पावसाचा अंदाज नसल्याचं पुणे वेधशाळेने स्पष्ट केलं आहे.

जुलै महिन्यात सक्रिय झालेली हवामान प्रणाली यामुळे राज्यात सर्वदूर पाऊस झाला मात्र ही प्रणाली आता कार्यरत नसल्यामुळे पावसाची अनुकूल परिस्थिती महाराष्ट्र वर सध्या नाही त्यामुळे पावसाचा जोर महाराष्ट्रात दिसत नसल्याचं पुणे वेधशाळेने सांगितलं. तसंच ऑगस्ट अखेरीस राज्यात 54 टक्के पावसाची तूट झाल्याची नोंद पुणे वेधशाळेने नोंदवली आहे. ऑगस्ट महिन्यात अपेक्षेपेक्षा कमी पाऊस झाला त्यामुळे राज्यातील सगळ्या जिल्ह्यांमध्ये पावसाची तूट नोंदवली गेली आहे.

# लोकसेवा आयोग विश्वासार्हता गमवत आहे का ? कणखर नेतृत्वाची गरज

## वर्षानुवर्ष स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या स्पर्धकांना आता आयोगाच्या परीक्षेची भीती

### पेपरफुटीच्या घटनांनी हादरलेल्या आयोगाला विश्वासार्हतेची गरज; 'व्यवस्था बदलण्यासाठी धाडसी निर्णय घेणारे नेतृत्व हवे'

महाराष्ट्रातील लाखो युवकांच्या स्वप्नांचा केंद्रबिंदू असलेली महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) ही संस्था सध्या एका अत्यंत महत्त्वाच्या वळणावर उभी आहे. राज्यातील तरुण अनेक वर्षे कठोर मेहनत, आर्थिक संघर्ष आणि मानसिक तणाव सहन करून प्रशासकीय सेवेत जाण्याचे स्वप्न पाहतात. मात्र, परीक्षा प्रक्रियेतील विलंब, अनिश्चितता, प्रशासकीय त्रुटी आणि अलीकडील पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांच्या मनात अस्वस्थता निर्माण झाली आहे.

अशा परिस्थितीत MPSC ला आता केवळ प्रशासकीय अनुभव असलेला अधिकारी नव्हे, तर पारदर्शकता, शिस्त, जबाबदारी आणि कठोर निर्णयक्षमता असलेले कणखर नेतृत्व देण्याची मागणी राज्यभरातून होत आहे. याच पार्श्वभूमीवर प्रशासनातील धडाडीचे अधिकारी म्हणून ओळख असलेले तुकाराम मुंडे यांची MPSC अध्यक्षपदी नियुक्ती करावी, अशी मागणी स्पर्धा परीक्षा विद्यार्थ्यांकडून आणि युवा रोजगार परिषदेकडून करण्यात येत आहे.

**पेपरफुटी प्रकरणाने निर्माण केले गंभीर प्रश्न**

अलीकडेच औषध निरीक्षक, गट-ब पदाच्या परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणामुळे MPSC च्या परीक्षा व्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. परीक्षा प्रक्रिया ही अत्यंत गोपनीय आणि विश्वासावर आधारित असते. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते परीक्षा केंद्रापर्यंत पोहोचवण्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावर सुरक्षेची जबाबदारी अत्यंत महत्त्वाची असते.

मात्र, जर याच प्रक्रियेत त्रुटी निर्माण होत असतील किंवा यंत्रणेतील काही व्यक्तींवरच संशय निर्माण होत असेल, तर त्याचा परिणाम केवळ एका परीक्षेपुरता मर्यादित राहत नाही. संपूर्ण आयोगाच्या विश्वासार्हतेवर त्याचा परिणाम होतो.

विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा विषय अत्यंत संवेदनशील आहे. कारण एका परीक्षेतील गैरप्रकारामुळे हजारो प्रामाणिक उमेदवारांच्या मेहनतीवर अन्याय होऊ शकतो.

**विद्यार्थ्यांच्या मनातील अस्वस्थता दूर करण्याचे आव्हान**

आज MPSC समोर सर्वात मोठे आव्हान आहे ते म्हणजे विद्यार्थ्यांचा विश्वास पुन्हा निर्माण करणे.

राज्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थी अनेक वर्षे स्पर्धा परीक्षांची तयारी करतात. अनेक विद्यार्थी आपल्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीशी संघर्ष करत शहरांमध्ये येतात. दिवस-रात्र अभ्यास करून ते सरकारी सेवेत जाण्याचे स्वप्न पाहतात.

परंतु परीक्षा कधी होणार, निकाल कधी लागणार, भरती प्रक्रिया पूर्ण होणार की नाही, अशा प्रश्नांनी विद्यार्थ्यांच्या मानसिक तणावात भर पडते.

त्यामुळे आयोगाला आता अशी कार्यपद्धती निर्माण करावी लागेल जिथे विद्यार्थ्यांना प्रत्येक टप्प्यावर पारदर्शकता आणि निश्चितता जाणवेल.

**तुकाराम मुंडे यांच्या नावामागे विद्यार्थ्यांची अपेक्षा काय?**

तुकाराम मुंडे हे महाराष्ट्रातील प्रशासन क्षेत्रातील एक चर्चेतील नाव आहे. शिस्तप्रिय अधिकारी, नियमांची काटेकोर अंमलबजावणी करणारे आणि कामातील पारदर्शकतेवर भर देणारे अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे.

त्यांच्या कार्यशैलीतील एक महत्त्वाचा पैलू म्हणजे जबाबदारी निश्चित करण्याची भूमिका आणि व्यवस्थेतील त्रुटींवर थेट प्रहार करण्याची पद्धत.

MPSC सारख्या संस्थेत अनेक स्तरांवर प्रशासनिक प्रक्रिया चालतात. येथे निर्णयक्षमता, वेळेचे नियोजन आणि उत्तरदायित्व निश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे अशा संस्थेला तुकाराम मुंडे यांच्यासारख्या कणखर अधिकाऱ्याची गरज असल्याचे विद्यार्थ्यांचे मत आहे.

**'MPSC ला पदाधिकारी नाही, तर सुधारक नेतृत्व हवे'**

विद्यार्थ्यांमध्ये अशी भावना आहे की, MPSC च्या अध्यक्षपदावर बसणाऱ्या व्यक्तीने केवळ बैठका घेणे आणि प्रशासकीय कामकाज पाहणे पुरेसे नाही. आयोगासमोरील आव्हाने लक्षात घेता अध्यक्षाने —

1. परीक्षा प्रक्रियेतील त्रुटी शोधणे,
2. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे,
3. गैरप्रकारांना आळा घालणे,
4. विद्यार्थ्यांशी संवाद वाढवणे,
5. वेळेत परीक्षा आणि निकाल जाहीर करण्याची व्यवस्था निर्माण करणे,यासाठी ठोस पावले उचलणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांच्या मते, MPSC ला आता "स्थिती कायम ठेवणारे" नव्हे तर "बदल घडवून आणणारे" नेतृत्व आवश्यक आहे.

**पारदर्शकतेशिवाय MPSC ची विश्वासार्हता टिकणार नाही**

कोणत्याही लोकसेवा आयोगाची खरी ताकद ही त्याच्या निष्पक्षतेत असते. परीक्षार्थींना विश्वास असला पाहिजे की मेहनत, गुणवत्ता आणि प्रामाणिक प्रयत्नांच्या आधारावरच यश मिळेल.

जर विद्यार्थ्यांच्या मनात परीक्षा प्रक्रियेबाबत संशय निर्माण झाला तर त्याचा परिणाम संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर होऊ शकतो.

त्यामुळे MPSC मध्ये पुढील सुधारणा करणे आवश्यक आहे :

१) प्रश्नपत्रिका सुरक्षेसाठी अत्याधुनिक प्रणाली

डिजिटल सुरक्षा, नियंत्रित प्रवेश आणि अधिक कडक निरीक्षण व्यवस्था आवश्यक आहे.

२) वेळेत परीक्षा आणि निकाल

भरती प्रक्रिया अनेक वर्षे रखडल्यास विद्यार्थ्यांचे वय, संधी आणि मानसिक स्थैर्य यावर परिणाम होतो.

३) तक्रार निवारण यंत्रणा

विद्यार्थ्यांनी केलेल्या गंभीर तक्रारींकडे तत्काळ आणि संवेदनशीलतेने पाहणे आवश्यक आहे.

४) जबाबदारी निश्चित करणे

गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे, जेणेकरून भविष्यात कोणीही अशा प्रकारचे धाडस करणार नाही.

**सरकारसमोर मोठी जबाबदारी**

MPSC अध्यक्षपदाचा निर्णय हा केवळ एका पदाची नियुक्ती नाही, तर महाराष्ट्रातील लाखो तरुणांच्या भवितव्याशी संबंधित निर्णय आहे. राज्य सरकारने विद्यार्थ्यांच्या भावना लक्षात घेऊन आयोगाला असे नेतृत्व द्यावे जे संस्थेची प्रतिष्ठा पुन्हा उंचावेल. आज विद्यार्थ्यांना केवळ आश्वासन नको आहे; त्यांना प्रत्यक्ष बदल हवा आहे. त्यांना अशी व्यवस्था हवी आहे जिथे परीक्षा वेळेवर होतील, निकाल वेळेत लागतील आणि प्रत्येक उमेदवाराला समान संधी मिळेल.

**निष्कर्ष : MPSC च्या पुनर्बांधणीची वेळ**

औषध निरीक्षक परीक्षा पेपरफुटी प्रकरणासारख्या घटनांनी निर्माण झालेला अविश्वास दूर करण्यासाठी मोठ्या निर्णयांची आवश्यकता आहे.

MPSC ही महाराष्ट्राच्या प्रशासनाची प्रवेशद्वार संस्था आहे. तिची विश्वासार्हता टिकवणे ही सरकार, आयोग आणि प्रशासनाची सामूहिक जबाबदारी आहे.

तुकाराम मुंडे यांची अध्यक्षपदी नियुक्ती करण्याची विद्यार्थ्यांची मागणी ही केवळ एका व्यक्तीची मागणी नसून, पारदर्शक, शिस्तबद्ध आणि जबाबदार परीक्षा व्यवस्थेची अपेक्षा आहे.

आता प्रश्न केवळ अध्यक्ष कोण होणार हा नाही, तर MPSC ला पुन्हा विद्यार्थ्यांचा विश्वास मिळवून देण्यासाठी कोणते नेतृत्व सक्षम ठरेल, हा आहे.

**- लक्ष्मीकांत कलमूर्गे,** नांदेड
अध्यक्ष - युवा रोजगार परिषद
मो. 8888087513

पान १ वरून

## 'नुलुपुन्नमी' निमित्त पूर्व भागात...

श्रीकांचना यन्नम, अशोक इंदापुरे, पोलीस उपायुक्त प्रीतम यावलकर, विजयालक्ष्मी कुर्री आदी उपस्थित होते.

**छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडतर्फे रथयात्रेवर पुष्पवृष्टी**

रथाचे विजापूर वेस येथे आगमन झाल्यावर छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेडतर्फे सालाबादप्रमाणे पुष्पवृष्टी करण्यात आली आणि पद्मशाली समाजातील मान्यवरांच्या सत्कार करून रथाला पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी ब्रिगेडचे शहराध्यक्ष हाजी मतीन बागवान, जिल्हाध्यक्ष म शफीक रचभरे, माजी महापौर आरीफ शेख, राम गायकवाड, बशीर सय्यद, राजू हुंडेकरी, रिजवान शेख, रिजवान पैलवान, रिझवान दंडोती, तन्वीर गुलजार, कादर भागानगरी, रुस्तुम शेख, लक्ष्मण भोसले, तनवीर शेख, हारिस शेख, मुबीन शेख, बाबा शेख, सरफराज काझी, हुजेर बागवान, सैभोद्दिन मणियार, हारून शेख, काशीफ बेलीफ, इरफान बावा, मोहसीन शेख, सरफराज काझी, शेरू उस्ताद आदी कार्यकर्ते आदी उपस्थित होते. यानिमित्ताने मुस्लिम ब्रिगेडतर्फे धार्मिक सलोखा व एकतेचा संदेश देण्यात आला.

## 'नुलुपुन्नमी' निमित्त पूर्व भागात...

आवश्यक आहे. त्यासाठी पारंपरिक पद्धतींबरोबरच आधुनिक तंत्रज्ञान आणि विविध डिजिटल टूल्सचा वापर करण्यात येईल. भाविकांना सुरक्षित, सुलभ आणि सुरळीत दर्शन व प्रवासाची सुविधा मिळावी, यासाठी एकात्मिक नियोजनावर भर दिला जाईल. हा विकास आराखडा केवळ शासनाला काहीतरी करायचे आहे म्हणून लादला जाणार नाही. पंढरपूरचे नागरिक आणि येथे येणारे लाखो भाविक यांच्या हिताचा विचार करूनच तो तयार केला जात आहे. स्थानिक नागरिक, आर्किटेक्ट्स आणि लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या सूचनांचा विचार करून आणि त्यातील शक्य त्या सर्व चांगल्या बाबी आराखड्यात समाविष्ट कराव्यात, असे निर्देश त्यांनी दिले.

**मंदिर-मठांना सुरक्षित ठेवून विकास**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पंढरपूरमधील जुनी मंदिरे आणि मठ यांचे धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन त्यांना आहे त्याच ठिकाणी ठेवून त्यांचा विकास केला जाईल. कोणतेही मंदिर किंवा मठ स्थलांतरित केले जाणार नाही. बाधितांचे योग्य पुनर्वसन करून 'जागेस जागा' देण्याचे शासनाचे धोरण आहे.विकास आराखड्यामुळे बाधित होणारे दुकानदार, रहिवासी आणि इतर व्यावसायिक यांच्या पुनर्वसनाला शासनाचे सर्वोच्च प्राधान्य राहील. पूर्वीच्या अनुभवांमुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेला अविश्वास दूर करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. बाधित दुकानदारांना पयार्यी दुकाने, तर बाधित होणाऱ्या ५०० हून अधिक घरांतील नागरिकांना योग्य पर्याय उपलब्ध करून देत नियोजन केले आहे. पंढरपूरमधील जमीन व मालमत्ता अधिग्रहणासाठी देण्यात येणारा मोबदला हा थेट मुंबईतील दरांच्या धर्तीवर देण्यात आला आहे. संपूर्ण भारतात एवढा मोठा मोबदला अन्यत्र दिला गेला नसावा, असेही ते म्हणाले.

**पंढरपूरच्या भविष्यातील अर्थव्यवस्थेलाही चालना**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, धार्मिक स्थळांचा नियोजनबद्ध विकास झाल्यास भाविकांची संख्या वाढते आणि त्याचा थेट सकारात्मक परिणाम स्थानिक अर्थव्यवस्थेवर होतो. त्यामुळे पंढरपूरच्या विकासाकडे केवळ पायाभूत सुविधांचा विषय म्हणून न पाहता भविष्यातील आर्थिक विकासाच्या दृष्टीनेही पाहणे आवश्यक आहे. पुढील अनेक दशकांचा विचार करून पंढरपूर अधिक सक्षम, सुरक्षित आणि भाविकांसाठी सुलभ बनविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. विकासाच्या प्रक्रियेत काही उणिवा राहिल्यास सूचना कराव्यात. सर्व घटकांनी परस्पर समन्वयातून काम करून पंढरपूरच्या विकासासाठी सर्वोत्तम मार्ग काढावा,अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सर्वांना सोबत घेऊन पंढरपूरचा सर्वांगीण, सुरक्षित आणि दीर्घकालीन विकास करण्याची शासनाची भूमिका असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीचे अभयराजे इंचगांवकर कुलकर्णी, व्यंकटेश नारायण कुलकर्णी, वीर रामकृष्ण महाराज, मुकुंद बडवे, बैभव बडवे, गणेश लंके, डॉ. प्राजक्ता बेणारे, चैतन्य बारसोडे, दर्शन महाजन बडवे, मनोजकुमार रामकिसन राठी आणि संजय आवताडे यांनी आपली मते व्यक्त केली.

# सिंहस्थ महाकुंभची सर्व कामे वेळेतच पूर्ण करणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## नाशिकमध्ये तीन दिवसीय महाकुंभ भक्ती संगम सोहळ्याची सुरुवात

**नाशिक (कटूसत्य वृत्त):-** सिंहस्थ कुंभमेळ्याचा कालावधी लक्षात घेता विविध कामे वेगात सुरू आहेत. सर्व संबंधित यंत्रणा ही कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. भारतीय संस्कृतीचा सर्वात मोठा अविष्कार असलेल्या या महासोहळ्याची सर्व कामे निधारीत वेळेत पूर्ण करण्यात येतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणातर्फे ठक्कर डोम येथे आजपासून सुरू झालेल्या तीन दिवसीय सिंहस्थ महाकुंभ भक्ती संगम कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीष महाजन, पणन मंत्री जयकुमार रावल, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत, शालेश शिक्षण मंत्री दादाजी भुसे, महापौर हिमगौरी आडके-आहेर, खासदार शोभा बच्छाव, राजाभाऊ वाजे उपस्थित होते.



सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने उत्तम सुविधा निर्माण करण्यात येत असल्याचे नमूद करीत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, साधुग्रामची जागा अडीच हजार कोटी रुपये खर्च करून कायमस्वरूपी अधिग्रहीत करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. या जागेचा उपयोग भविष्यातही कुंभमेळ्यासाठीच व्हावा, यासाठी त्यांची योग्य पद्धतीने व्यवस्था करण्यात येणार आहे. कुंभमेळ्यासाठी रस्ते, पायाभूत सुविधा तसेच भाविकांसाठी आवश्यक विविध नागरी सुविधा विकसित करण्यात येत आहेत. साधुग्रामच्या जागांबाबत काही नागरिक व शेतकऱ्यांच्या तक्रारी असल्यास त्या संवेदनशीलतेने त्या दूर करण्यात येतील. शक्य त्या सुधारणा करण्यात येऊन संबंधितांना योग्य मोबदला मिळावा, यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले, कुंभमेळ्यासाठी खर्च होणाऱ्या निधीतून नाशिक, त्र्यंबकेश्वरसह जिल्ह्यात दीर्घकाळासाठी पायाभूत सोयीसुविधा निर्माण होणार आहेत. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर कामे सुरू असल्याने नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरातील नागरिकांना काही प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. याची जाणीव शासन-प्रशासनाला असून कामे पूर्ण झाल्यानंतर नागरिक निश्चितपणे या कामांचे स्वागत करतील. सिंहस्थ कुंभमेळ्याची तयारी वेळेच्या मयार्देत पूर्ण करण्यासाठी सर्व विभागांमध्ये समन्वय साधण्यात येत आहे. तसेच इतर सर्व संबंधित विभागांनी कामांना गती दिली आहे. कामांमध्ये येणाऱ्या अडचणी तातडीने दूर करून आवश्यक त्या सर्व उपाययोजना पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. सर्वांच्या सहकार्याने सिंहस्थ कुंभमेळ्याची तयारी दर्जेदार, पारदर्शक पद्धतीने आणि नियोजित वेळेत पूर्ण करून हा कुंभमेळा सुरक्षित, सुव्यवस्थित आणि यशस्वी करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले , भारतीय संस्कृती ही जगातील प्राचीन संस्कृतीपैकी एक आहे. विज्ञान, तंत्रज्ञान आणि विविध ज्ञानशाखांमध्ये हजारो वर्षांपूर्वी आपल्या देशात प्रगत विचार अस्तित्वात होते. भारतीय संस्कृतीची सर्वात मोठी ताकद म्हणजे प्रश्न विचारण्याची आणि नव्या विचारांचा स्वीकार करण्याची परंपरा होय. महाकुंभ या भारतीय संस्कृती, परंपरा आणि विविधतेचा मोठा आविष्कार आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या माध्यमातून देशभरातील विविध भक्ती परंपरांचा संगम नाशिकमध्ये अनुभवता येणार आहे. पंजाबपासून महाराष्ट्रापर्यंत, राजस्थानपासून गुजरातपर्यंत तसेच पूर्वोत्तर भारतातील विविध भागांतील भक्ती परंपरांचे दर्शन या सोहळ्यात घडणार आहे. भक्ती संगमाच्या माध्यमातून सिंहस्थ कुंभमेळ्याची सुरुवात होत असून ३१ ऑक्टोबर रोजी ध्वजारोहण होईल. साधू-संतांचे आशीर्वाद आणि सर्वांच्या सहकार्याने सिंहस्थ कुंभमेळा निर्विघ्नपणे आणि यशस्वीपणे पार पडेल, असा विश्वास मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला.

पालकमंत्री श्री. महाजन म्हणाले की, सिंहस्थ कुंभमेळा हा केवळ धार्मिक परंपरा नसून भारताची अध्यात्मिक, सांस्कृतिक व ऐतिहासिक परंपरा जगासमोर मांडणारा सोहळा आहे. हा कुंभमेळा शासनाचा नव्हे, तर प्रत्येक नाशिककरांचा आहे. त्यामुळे कुंभमेळा सुंदर, स्वच्छ, सुरक्षित आणि सुरेल करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने सहभागी होणे आवश्यक आहे. महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक, व्यापारी, स्वयंसेवी संस्था आणि समाजातील विविध घटकांनी या महत्त्वपूर्ण आयोजनात आपला सहभाग नोंदवावा, कुंभमेळा यशस्वी करण्यासाठी शासन आणि प्रशासनासोबत नाशिककरांनीही एकजुटीने पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. सर्वांच्या सहभागातून नाशिकचा सिंहस्थ कुंभमेळा देशासाठी आदर्श ठरेल, असा विश्वास मंत्री गिरीष महाजन यांनी व्यक्त केला.

कुंभमेळ्याला भारताच्या सांस्कृतिक परंपरेत अनन्यसाधारण महत्त्व आहे. देशाच्या विविध भागांतून तसेच परदेशातून भाविक, साधू-संत आणि पर्यटक मोठ्या संख्येने नाशिकमध्ये येतात. त्यामुळे कुंभमेळ्याच्या माध्यमातून नाशिकची आध्यात्मिक आणि सांस्कृतिक ओळख अधिक व्यापक स्तरावर पोहोचविण्याची संधी उपलब्ध झाली आहे. कुंभमेळा म्हणजे केवळ नदीच्या तीरावर होणारा धार्मिक उत्सव नाही. भारताची विचारपरंपरा, अध्यात्म, संतपरंपरा, संस्कृती आणि ऐतिहासिक वारसा यांचा अनुभव देणारा हा महत्त्वपूर्ण सोहळा आहे. त्यामुळे कुंभमेळ्याचे आयोजन करताना धार्मिक कार्यक्रमांसोबतच सांस्कृतिक, संगीत आणि कलात्मक कार्यक्रमांनाही महत्त्व देणे आवश्यक आहे. याच उद्देशाने कुंभमेळ्याच्या निमित्ताने तीन दिवस विविध विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. प्रत्येक नाशिककराने हा कुंभ 'आपला कुंभ' आहे, असे समजून आयोजनात सहभागी व्हावे, असे आवाहनही श्री.महाजन यांनी केले.

विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी आपल्या प्रास्ताविकात सिंहस्थ कुंभमेळ्याचे महात्म्य, प्राधिकरणामार्फत सुरू असलेली कामे व सिंहस्थ महाकुंभ भक्ती संगम कार्यक्रम आयोजनामागील भूमिका विशद केली. प्राधिकरणाचे आयुक्त श्री. सिंह यांनी आभार मानले.

कार्यक्रमास आमदार किशोर दराडे, गोकुळ गिते, आमदार देवयानी फरांदे, आमदार डॉ. राहुल आहेर, आमदार सीमा हिरे, सरोज अहिरे, हिरामण खोसकर, डॉ सदानंद मोरे, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, विशेष पोलीस महानिरीक्षक संजय ऐनापुरे, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आयुक्त जलज शर्मा, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलिस अधीक्षक डॉ. स्वामी, उपमहापौर विलास शिंदे, त्र्यंबक नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार, कार्यक्रमास नाशिक व त्र्यंबकेश्वर येथील सर्व प्रमुख आखाड्यांचे साधू, संत, महंत, लोकप्रतिनिधी, नागरिक, विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सिंहस्थ सहाय्यक समितीची पुस्तिका, संकेतस्थळ आणि पचे मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. तसेच यावेळी 'आपला कुंभपर्व माझी जबाबदारी' प्रतिज्ञा घेण्यात येत आहे.

### वात्रटिका

**महाप्रलय**

समजू नका स्वतःला भारी
कोण सांगा प्रबल असतो...
निसर्गाच्या पुढे काय चालते
सगळेच आपण हतबल असतो...
वाहून गेले होते जवळ जे काही
तशी माणूसकीही वाहून गेली...
टाळूवरचे लोणी खाणारे कुठेही
असतात ही गोष्ट कळून आली...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादक: श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालय: एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादक: पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादक: सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागार: ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# कारागृहातील बंदी बांधवांना राखी बांधून रक्षाबंधन उत्सव साजरा

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा कारागृह, वर्ग-2 येथे प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, शाखा सोलापूर, महिला उत्थान मंडळ तसेच अन्नपूर्णा फाऊंडेशन संचलित जय हिंद फूड बँक, सोलापूर या सामाजिक सेवाभावी संस्थांच्या वतीने कारागृहातील बंदी बांधवांना राखी बांधून रक्षाबंधन उत्सव उत्साहपूर्ण व भावूक वातावरणात साजरा करण्यात आला.

बंदी बांधवांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासोबतच त्यांच्यातील मानवी संवेदना जागृत ठेवण्याच्या उद्देशाने या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी सामाजिक संस्थेतील मनाली तमशेट्टी व जयमाला राजपूत यांनी रक्षाबंधन सणाचे महत्त्व सांगितले. तसेच विजयालक्ष्मी चव्हाण, मीनाक्षी चव्हाण, प्रतिभा तमशेट्टी, ब्रह्मकुमारी सदिक्षा यांच्यासह अन्य महिलांनी बंदी बांधवांना राख्या बांधल्या.

राखी बांधताना अनेक बंदी बांधवांना आपल्या कुटुंबीयांची व बहिणींची आठवण झाली. त्यामुळे काही बंदी बांधव भावूक झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

'या उपक्रमाच्या माध्यमातून बंदी बांधवांमध्ये सकारात्मक बदल व्हावा,' हा मुख्य उद्देश असल्याचे कारागृह अधीक्षक सुशील कुंभार यांनी सांगितले. तसेच या उपक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व सामाजिक सेवाभावी संस्थांच्या प्रतिनिधींचे त्यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी कारागृह अधीक्षक सुशील कुंभार, वरिष्ठ तुरूंगाधिकारी बिरू खळबुटे तसेच कारागृह प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कारागृह शिक्षक अंगद गव्हाणे यांनी केले.

अशी माहिती जिल्हा कारागृह अधिक्षक सुशील कंभार यांनी दिली आहे.

# वृक्षांना राख्या बांधून राखी पौर्णिमा साजरी

## एन. के. किड्स स्कूलचा पर्यावरणपूरक उपक्रम



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राखी पौर्णिमेच्या निमित्ताने बाळे येथील राजेश्वरी नगर परिसरातील एन. के. किड्स स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी वृक्षांना राख्या बांधून पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश दिला. विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या आकर्षक राख्या शाळेच्या परिसरातील वृक्षांना बांधत राखी पौर्णिमा मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरी केली.

राखी पौर्णिमा म्हणजे केवळ भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा सण नसून, निसगार्शी असलेले आपले नाते अधिक दृढ करण्याची संधी आहे, हा संदेश या उपक्रमातून विद्यार्थ्यांना देण्यात आला. 'वृक्ष आहेत तर जीवन आहे; त्यामुळे वृक्षांचे संरक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे,' असा पर्यावरणपूरक संदेश यावेळी देण्यात आला.

या उपक्रमासाठी विद्यार्थ्यांनी विविध रंगीबेरंगी क्राफ्ट पेपरचा वापर करून वेगवेगळ्या प्रकारच्या सुंदर व आकर्षक राख्या स्वतःच्या हाताने तयार केल्या होत्या. त्यानंतर या राख्या शाळेच्या परिसरातील वृक्षांना बांधून विद्यार्थ्यांनी वृक्षसंवर्धनाची शपथ घेतली. वृक्षांनाही आपल्या कुटुंबातील सदस्याप्रमाणे जपले पाहिजे, हा विचार विद्यार्थ्यांच्या मनात रुजविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका श्वेता कस्तुरे, शिक्षिका पूनम कळसाईत, प्राजक्ता भस्मे, रोहिणी आदलिंगे, तसेच सेविका संगीता हेगडकर आणि शिंदे मावशी उपस्थित होत्या. शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याचे आवाहन केले.

राखीच्या पवित्र धाग्याने वृक्षांशी नाते जोडत, 'झाडे लावा, झाडे जगवा आणि पर्यावरण वाचवा' हा संदेश देणारा एन. के. किड्स स्कूलचा हा उपक्रम उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेत होता.

# वाशिंबे स्थानकावर दौंड-कलबुर्गी शटलचे उत्साहात स्वागत



**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** तालुक्यातील वाशिंबे रेल्वे स्थानकावर दौंड-कलबुर्गी शटल गाडीला प्रवासी थांबा सुरू झाल्याने परिसरातील ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शुक्रवार (दि. २८ ऑगस्ट) रोजी शटल गाडी वाशिंबे स्थानकावर दाखल होताच ग्रामस्थांनी उत्साहात गाडीचे स्वागत केले. यावेळी लोको पायलट यांचा शाल, श्रीफळ व पेढे देऊन सत्कार करण्यात आला. ग्रामस्थांनी प्रवाशांना पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला. तसेच वाशिंबे स्थानकावर शटलला प्रवासी थांबा मंजूर केल्याबद्दल रेल्वे प्रशासनाचे आभार मानण्यात आले.

थांबा सुरू झाल्याच्या पहिल्याच दिवशी वाशिंबे येथून अक्कलकोट, गंगापूर आणि सोलापूरकडे जाणाऱ्या तब्बल ६८ प्रवाशांनी या शटलने प्रवास केला. त्यामुळे नव्याने सुरू झालेल्या थांब्याला पहिल्याच दिवशी प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले.

या थांब्यामुळे वाशिंबे व परिसरातील विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी, नोकरदार तसेच सर्वसामान्य नागरिकांची मोठी सोय झाली आहे. अनेक दिवसांपासूनची मागणी पूर्ण झाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

दौंड-कलबुर्गी शटल गाडी वाशिंबे येथून सकाळी ७.१० वाजता कुर्डूवाडी स्थानकावर पोहोचते. त्यामुळे वाशिंबे परिसरातील प्रवाशांना कुर्डूवाडी येथे उतरून पुढील प्रवासासाठी विविध एक्स्प्रेस गाड्यांची जोडणी घेणे शक्य होणार आहे. कुर्डूवाडी येथून पंढरपूर, कोल्हापूर, आदमापूर, मिरज, लातूर, बार्शी, हरंगुळ, दौंड, अहिल्यानगर आणि पुणे आदी ठिकाणी जाण्यासाठी उपलब्ध असलेल्या रेल्वे सेवांचा वाशिंबे व परिसरातील प्रवाशांना लाभ घेता येणार आहे. त्यामुळे या थांब्यामुळे परिसरातील नागरिकांना विविध शहरांशी रेल्वेमार्गे जोडले जाण्याची सुविधा अधिक सुलभ झाली आहे.

वाशिंबे येथे प्रवासी थांबा सुरू झाल्याच्या पहिल्याच दिवशी ६८ प्रवाशांनी प्रवास केल्याने या सुविधेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे स्पष्ट झाले आहे. या थांब्यामुळे सोलापूर, अक्कलकोट, गंगापूरसह अन्य शहरांमध्ये जाणे सुलभ झाले असून, कुर्डूवाडी येथे मिळणाऱ्या पुढील रेल्वे गाड्यांच्या जोडणीमुळे वाशिंबे स्थानकाचा प्रवाशांना अधिक मोठा फायदा होणार आहे. त्यामुळे आगामी काळात स्थानकावरील प्रवासी संख्या आणखी वाढण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# जात प्रमाणपत्र पडताळणीतील त्रुटींची तातडीने पूर्तता करण्याचे आवाहन

**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** जात वैधता प्रमाणपत्राअभावी मागासवर्गीय विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशापासून वंचित राहू नयेत, यासाठी ज्या अर्जदार/विद्यार्थ्यांनी अद्यापही वैधता प्रमाणपत्रातील त्रुटींची पूर्तता केलेली नाही, त्यांनी संबंधित जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीशी त्वरित संपर्क साधावा, तसेच त्रुटींची पूर्तता करावी, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी), महासंचालक तथा राज्यातील सर्व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांच्या मुख्य समन्वयक, श्रीमती दीपा मुधोळ-मुंडे यांनी केले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, कृषी शिक्षण, वैद्यकीय/आयुष शिक्षण आणि कला शिक्षण विभागाच्या विविध पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये राखीव प्रवगार्तून प्रवेशासाठी केंद्रभूत प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे.

अभ्यासक्रम प्रवेशाच्या तारखा राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून जाहीर करण्यात आलेल्या आहेत. तरीही, समित्यांकडे अनेक विद्यार्थ्यांनी उशिराने अर्ज सादर केल्याचे दिसून आले आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी पात्र विद्यार्थ्यांना त्रुटींची पूर्तता करण्याबाबत एसएमएस, ईमेल व पत्राद्वारे संबंधित समित्यांमार्फत कळवण्यात आले असतानाही, अनेक अर्जदार/विद्यार्थ्यांनी संबंधित समितीशी संपर्क साधलेला नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्रुटींची पूर्तता करण्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदारांचीच आहे.

अर्जदारांची गैरसोय होऊ नये यासाठी, आवश्यकतेनुसार जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांनी सुट्टीच्या दिवशीही कार्यालय सुरू ठेवावे, असे निर्देश महासंचालक, बार्टी तथा मुख्य समन्वयक, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या यांना देण्यात आले आहेत.

# न्यायिक सेवा पूर्व प्रशिक्षणासाठी वकिलीचा अनुभव ३ वर्षांवरून १ वर्ष

**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विधी/न्यायिक सेवा परीक्षा (JMFC व CJJD) पूर्व प्रशिक्षण योजनेच्या पात्रतेत महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका (सिव्हिल) क्र. १११०/२०२५ च्या संदर्भात दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर (CJJD) परीक्षेसाठी आवश्यक असलेला वकिलीचा अनुभव (Law PrÔctice) तीन वर्षांवरून एक वर्ष करण्याचा निर्णय घेतला आहे.

या निर्णयाच्या अनुषंगाने सामायिक चाळणी परीक्षा-२०२६ च्या ऑनलाइन अर्ज प्रक्रियेत, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विधी/न्यायिक सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनेसाठी असलेली तीन वर्षांच्या वकिलीच्या अनुभवाची अट बदलून एक वर्ष करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सर्वंकष धोरणाच्या अनुषंगाने वर्ष २०२६-२७ करिता टीआरटीआय, बार्टी, सारथी, अमृत आणि आर्टी या स्वायत्त संस्थांमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनांसाठी घेण्यात येणाऱ्या सामायिक चाळणी परीक्षा-२०२६ करिता ऑनलाइन अर्ज करण्याची प्रक्रिया दिनांक ९ ऑगस्ट २०२६ पासून सुरू करण्यात आली आहे.

टीआरटीआय, बार्टी, सारथी, अमृत आणि आर्टी या संस्थांच्या लक्षित गटातील पात्र व इच्छुक उमेदवारांनी सुधारित पात्रता निकषाची नोंद घेऊन त्यानुसार ऑनलाइन अर्ज करावा, असे आवाहन निलेश सागर (भा.प्र.से.), अध्यक्ष, स्पर्धा परीक्षा पूर्व प्रशिक्षण अंमलबजावणी व समन्वय समिती तथा आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (आसंप्रसं), पुणे यांनी केले आहे.

# जैन गुरुकुलच्या गाईड्सनी पाठविली सैनिकांसाठी राखी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री ऐ.प.दि. जैन पाठशाळा संचालित श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशालेत सैनिकांसाठी पाठविण्यात येणारी पर्यावरणपूरक राखी कार्यशाळा मुख्याध्यापक राजकुमार काळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या कार्यशाळेसाठी प्रमुख अतिथी रमाकांत शिवशरण, उपमुख्याध्यापक शैलेश पांगळ, पर्यवेक्षक प्रवीण कस्तुरे, यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने मान्यवरांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. ८वीतील गाईड औदुंबरी पोतदार हिने कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर गाईड भावना पवार हिने अतिथींचा परिचय करून दिला. यावेळी रमाकांत शिवशरण यांनी विद्यार्थ्यांना रेशीम धागा, लोकर व कागद यांच्यासाह्याने पर्यावरणपूरक राखी तयार करण्यासाठी प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. यावेळी गाईडस्नी भारतीय सैनिकांसाठी रक्षासंदेश पाठवून सैनिकांप्रति कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यशाळेत सरस्वती गाईड पथकातील ८० गाईडस्नी राखी तयार करण्याचा आनंद घेतला. कार्यक्रमाचे अध्यक्ष राजकुमार काळे यांनी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्यांचे कौतुक करत या अभिनव उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सरस्वती गाईड पथक प्रमुख तृप्ती माणिकशेटे, लोहिया शहा व कलाशिक्षक अरविंद गोटीमुकूल यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ईश्वरी कदम हिने केले तर नम्रता गुढे हिने उपस्थितांचे आभार मानले.

# एसटी महामंडळाच्या सोलापूर विभागात शिकाऊ उमेदवारांची भरती

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, सोलापूर विभागामार्फत सन 2026-27 या सत्रासाठी विविध व्यवसायांमध्ये एक वर्ष कालावधीसाठी 306 शिकाऊ उमेदवारांची भरती करण्यात येणार आहे.

या भरतीसाठी पात्र उमेदवारांनी www.apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर टरफ्ळउ Solapur Division करिता ऑनलाइन नोंदणी करणे आवश्यक आहे. सोलापूर विभागासाठी आस्थापना नोंदणी क्रमांक E09162700889 असा आहे. उमेदवारांनी संबंधित संकेतस्थळावर आपली नोंदणी करून भरती प्रक्रियेत सहभागी व्हावे.

ऑनलाइन नोंदणीची अंतिम मुदत दि. 14 सप्टेंबर 2026 पर्यंत आहे. त्यामुळे इच्छुक व पात्र उमेदवारांनी अंतिम मुदतीपूर्वी नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

भरतीसंदभार्तील अधिक माहितीसाठी विभागीय कार्यालय, 190, बुधवार पेठ, सोलापूर - 413002 येथे संपर्क साधावा, असे विभाग नियंत्रक अमोल चंद्रकांत गोंजारी यांनी कळविले आहे.

संकेतस्थळ : www.apprenticeshipindia.gov.in

## जाहिर प्रसिध्दीकरण

जन्म नोंदणी
अर्ज क्र.४४०/२०२६

**मोहोळ येथील मा. तहसिलदार साहेब यांचे न्यायालयात**

मोहन आत्माराम दगडे } **अर्जदार**

**विरूध्द**

गामसेवक, ग्रामपंचायत, देगाव (वा) } **सामनेवाला**

ज्याअर्थी, अर्जदार मोहन आत्माराम दगडे याचा जन्म दि. ०१/०६/१९६४ रोजी झाला आहे. त्याच्या जन्माची नोंद देगाव (वा) येथील ग्रामपंचायत कार्यालयामध्ये जन्म तारखेपासून एक महिन्याच्या आत करणे आवश्यक असल्याची माहिती व जाणिव अर्जदारास नव्हती. त्यामुळे सदरची नोंद करण्याचा आदेश देगाव (वा) ग्रामपंचायत यांना व्हावा अशी मागणी अर्जदाराने मे. कोर्टामध्ये सदरचा अर्ज दाखल करून केलेली आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस सदर प्रसिध्दीकरणाव्दारे कळिवण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे मोहन आत्माराम दगडे याचा जन्म दि. ०१/०६/१९६४ रोजी झाल्यामुळे त्याच्या जन्माची नोंद देगाव (वा) ग्रामपंचायतचे रेकॉर्ड मध्ये घेण्यास कोणाचीही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपली तक्रार/हरकत स्वतः अगर वकीलामार्फत या मे. कोर्टात सादर करावी. मुदतीत कोणाची हरकत न आल्यास कायदेशीर बाबींचा विचार करून मा. ग्रामसेवक, ग्रामपंचायत देगाव (वा) यांना मोहन आत्माराम दगडे याचा जन्म दि. ०१/०६/१९६४ रोजी झाल्याची नोंद घेण्याचा आदेश करण्यात येईल, त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.ही जाहीर नोटीस दि. १८/०८/२०२६

शिक्का

**सही/-**
**तहसिलदार,मोहोळ.**

## जाहिर प्रसिध्दीकरण

मृत्यू नोंदणी
अर्ज क्र.४३९/२०२६

**मोहोळ येथील मा. तहसिलदार साहेब यांचे न्यायालयात**

विजयकुमार रामचंद्र भांगे } **अर्जदार**

**विरूध्द**

ग्रामपंचायत ग्रामसेवक, शेटफळ } **सामनेवाला**

ज्याअर्थी, अर्जदाराची आई सिताबाई रामचंद्र भांगे ही दि. ०५/०५/२००५ रोजी रोजी मरण पावली आहे. तिच्या मृत्यूची नोंद शेटफफळ येथील ग्रामपंचायत कार्यालयामध्ये मृत्यू तारखेपासून एक महिन्याच्या आत करणे आवश्यक असल्याची माहिती व जाणीव अर्जदारांना नव्हती. त्यामुळे सदरची नोंद करण्याचा आदेश ग्रामसेवक शेटफफळ यांना व्हावा अशी मागणी अर्जदाराने मे. कोर्टामध्ये सदरचा अर्ज दाखल करून केलेली आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस सदर प्रसिध्दीकरणाव्दारे कळिवण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे अर्जदाराची आई सिताबाई रामचंद्र भांगे ही दि. ०५/०५/२००५ रोजी झाल्यामुळे तिच्या मृत्यूची नोंद शेटफफळ ग्रामपंचयातीच्या रेकॉर्ड मध्ये घेण्यास कोणाचीही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपली तक्रार/हरकत स्वतः अगर वकीलामार्फत या मे. कोर्टात सादर करावी. मुदतीत कोणाची हरकत न आल्यास कायदेशीर बाबींचा विचार करून ग्रामसवेक शेटफफळ यांना अर्जदाराची आई - सिताबाई रामचंद्र भांगे ही दि. ०५/०५/२००५ रोजी मरण पावल्याची नोंद घेण्याचा आदेश करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही काहीही हरकत चालणार नाही याची नोंद घ्यावी.ही जाहीर नोटीस दि. १८/०८/२०२६

शिक्का

**सही/-**
**तहसिलदार,मोहोळ.**

# रांझणी येथे 10 ब्रास वाळूचा अवैध साठा जप्त

## एकाविरुद्ध गुन्हा दाखल



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी पासून 12 किलोमीटर अंतरावर असलेल्या रांझणी (ता. माढा) येथील शिवारात शासनाची कोणतीही परवानगी न घेता वाळूचा अवैध उपसा करून साठा केल्याप्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत अंदाजे 14 हजार रुपये किमतीची 10 ब्रास वाळू आढळून आली.

टेंभुर्णी पोलिसाकडून सविस्तर मिळालेली माहिती अशी की दि. 22 ऑगस्ट 2026 रोजी सायंकाळी 6 वाजण्यापूर्वी रांझणी गावच्या शिवारातील शेती गट क्रमांक 31/1 येथे ओंकार उर्फ गणेश प्रकाश कदम (रा. रांझणी, ता. माढा, जि. सोलापूर) याने त्याच्या राहत्या घराजवळ अंदाजे 10 ब्रास वाळूचा अवैध साठा केल्याचे आढळून आले.

प्रत्येक ब्रास वाळूची किंमत सुमारे 1,400 रुपये असून एकूण वाळूची किंमत 14,000 रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. शासनाची संमती न घेता वाळूचा उपसा करून ती रांझणी शिवारातील गट क्रमांक 31/1 मध्ये आणून अवैधरीत्या साठविल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी दादाराम दत्तू गुटाळ (वय 57, व्यवसाय नोकरी, रा. उजनी टे., ता. माढा, जि. सोलापूर) यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली. त्यांच्या फियार्दीवरून ओंकार उर्फ गणेश प्रकाश कदम याच्याविरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर 921/2026 अन्वये भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 303(2) तसेच पर्यावरण संरक्षण कायदा कलम 9, 15 आणि भारतीय गौण खनिज कायदा कलम 4(1), 4(क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब भरणे यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस उपनिरीक्षक भीमराव गोळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक 428 सागर शिंदे करीत आहेत.


# Classified - छोटी जाहीरात

## बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

## पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

## वर-वधू




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंद्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) उमेदवाराचा आश्वासनांचा जाहीरनामा २) दुष्काळात प्रत्येकाला रोजगार मिळण्यासाठी शासन चालवत असलेली योजना-**** ** योजना ३) लाभ, उपयुक्त ४) नशीब (हिंदीत) ५) राहुल गांधी यांच्या बहिणीचे नाव ६) स्त्रियांना कपाळभर लावलेले कुंकू ७) येणाऱ्या काळात ११) गडबड, धांदल १२) भय, भीती (हिंदीत) १३) फटाक्यांची माळ १५) विमान उतरण्याची जागा १८) मुख्याध्यापक २०) हात, टॅक्स २१) बाहेरच्या विरूध्दार्थी २३) दुप्पट (इंग्रजीत) २४) मजबूत, कणखर २५) विचार, निर्धार (हिंदीत) २९) एक जगप्रसिध्द धरण कालवा ३०) सायकलचे चाक ३१) मत देण्याची क्रिया ३२) कामाचा मिळणारा आर्थिक मोबदला ३४) सलमान खानच्या बंधूचे नाव ३५) मराठी चित्रपटसृष्टीतील एक अभिनेता-*** भावे
३८) मनसे अध्यक्ष-** ठाकरे
३९) दु:ख (हिंदीत)
४०) कावळ्याचे ओरडणे **काव
४२) याच्या पिठापासून चपाती अथवा पोळी करतात

**आडवे शब्द :** १) खा. राहुल गांधी यांचे भाजपमध्ये असलेले चुलतबंधू
२) आमदार असलेले पवारांचे नातू-*** पवार
५) पंकजा मुंडे यांच्या खासदार असलेल्या बहिणीचे नाव
७) एक हिंदी भाषिक न्यूज चॅनल ८) तीन गुणिले तीन
९) छ. शिवरायांना राज्याभिषेक करणारे धर्मगुरू-** भट्ट १०) गायीचे वासरू
१३) छगन भुजबळ यांचे एक पुतणे
१४) भारतीय क्रिकेट संघातील एक माजी खेळाडू -** शास्त्री
१६) नाला १७) सासरच्या विरूध्दार्थी १९) पाकचा एक माजी फलंदाज-इंझमाम उल ** २१) दंगल चित्रपटातील प्रमुख अभिनेता २२) पुसटच्या विरूध्दार्थी
२५) बिल्डिंग (मराठीत) २६) याच्यावर भाकरी भाजतात २७) णब उलट लिहा
२८) बरोबर, योग्य २९) वास, गंध ३२) धनी ३३) दरवाजा ३४) उमेदवाराने डिपॉझिट म्हणून भरलेली रक्कम (मराठीत) ३५) मुलाची पत्नी
३६) कपडे धुण्याची प्रसिध्द पावडर ३७) रामदास स्वामींनी लिहिलेला ग्रंथ
३८) क्रोध, संताप ४०) श्रवणेंद्रिय ४१) मेंढीपालन करणारा समाज, सरकारने यांच्या आरक्षणाचा प्रश्न प्रलंबित ठेवला आहे ४३) वस्तूंची एकत्र केलेली जुळवाजुळव
४४) तूप (हिंदीत)

## सुडोकु - 41

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | 1 | | | 4 | | | |
| 2 | | | | | | 7 | | |
| 3 | 4 | | 7 | 6 | | 5 | | |
| | | 3 | | | 5 | 9 | | 7 |
| | | | 6 | 7 | 8 | | 3 | 2 |
| | 2 | 7 | | | 1 | | | |
| | 3 | 2 | 4 | 9 | 7 | 8 | 6 | 5 |
| | | | 1 | 2 | | | | |
| 7 | 6 | 4 | | 8 | 3 | | 2 | |

# पत्रकार गोंजारींवरील गुन्ह्याविरोधात पत्रकार संघटना आक्रमक

## पोलीस आयुक्त, जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एबीपी माझाचे प्रतिनिधी मंदार गोंजारी यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याच्या निषेधार्थ सोलापुरातील पत्रकार संघटना आक्रमक झाल्या आहेत. मंदार गोंजारी यांच्यावरील गुन्हा सात दिवसांत मागे घ्यावा अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सोलापूर श्रमिक पत्रकार संघ आणि महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाने दिला आहे.

या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठविण्यात आले असून, संबंधित प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून पत्रकाराला न्याय देण्याची मागणी करण्यात आली आहे. पत्रकारिता करताना वस्तुस्थिती मांडणाऱ्या पत्रकारांवर दबाव आणणे किंवा त्यांच्यावर गुन्हे दाखल करणे हा चिंतेचा विषय असल्याचे संघटनांनी म्हटले आहे.

**महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष नगरसेवक** मनीष केत आणि सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांच्या नेतृत्वाखाली पत्रकारांच्या शिष्टमंडळाने गुरुवारी सोलापूरचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार आणि निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांना निवेदन देण्यात आले. यावेळी संघाचे खजिनदार किरण बनसोडे, उपाध्यक्ष आफताब शेख, मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अभिषेक आदेप्पा, क्राईम रिपोर्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष तात्या लांडगे, अरुण रोटे, अनिल कदम, चंद्रकांत मिराखोर, अनिकेत गायकवाड, सौरभ वाघमारे, प्रीतम पंडित, विश्वभूषण लिमये, आयुब कागदी, वसीम आत्तार, संदीप वाडेकर, विनोद हुमनाबादकर,विजय आवटे, राकेश कदम, उमेश कदम, अंबादास पोळ, आप्पासाहेब पाटील, इम्रान सगरी, सचिन जाधव, महेश हाणमे, मकरंद ढोबळे, यासीन शेख, हुजेब इनामदार, संतोष कासे, विक्रांत कालेकर, दत्ता केरे, साकिब शेख, तौसिफ शेख, राजू बंडगर यांच्यासह पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**पत्रकारांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र यंत्रणा हवी : विक्रम खेलबुडे**

पत्रकार कर्तव्य बजावत असताना त्यांच्यावर दबाव आणणे अथवा गुन्हे दाखल होणे ही गंभीर बाब आहे. पत्रकारांना अशा प्रकारच्या अन्यायापासून संरक्षण देण्यासाठी शासनाने ठोस आणि प्रभावी यंत्रणा उभी करावी, अशी मागणी श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी केली. पुण्यात पत्रकारांबाबत घडलेल्या घटनेचाही त्यांनी निषेध केला.

गोंजारी यांच्यावरील कारवाईच्या निषेधार्थ सोलापुरातील पत्रकार संघटना एकवटल्या आहेत. पत्रकारांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यासोबतच त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पत्रकारांविरोधात दाखल होणाऱ्या गुन्ह्यांची चौकशी करताना संबंधित पत्रकारितेचा संदर्भ, बातमीमागील वस्तुस्थिती आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा विचार केला जावा, अशी भूमिका संघटनांनी घेतली आहे.

**सात दिवसांत निर्णय घ्या : मनीष केत**

मंदार गोंजारी यांच्यावर चुकीच्या पद्धतीने गुन्हा दाखल करण्यात आला असून, तो सात दिवसांच्या आत मागे घ्यावा. अन्यथा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने राज्यभर तीव्र आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष तथा नगरसेवक मनीष केत यांनी दिला.

# पोलीस बांधवांच्या मनगटावर राखी

## विद्यार्थिनींनी जपली रक्षाबंधनाची अनोखी परंपरा!

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** रक्षाबंधनाचा सण केवळ भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा उत्सव न राहता समाजातील रक्षणकर्त्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा सुंदर संदेश देत नातेपुते येथील एस. एन. डी. इंटरनॅशनल सीबीएसई स्कूलच्या इयत्ता नववीतील विद्यार्थिनींनी अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन साजरे केले.



विद्यार्थिनींनी नातेपुते पोलीस ठाण्यास भेट देऊन सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल वायकर तसेच पोलीस कर्मचारी यांना राखी बांधली. यावेळी विद्यार्थिनींनी पोलीस बांधवांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा देत त्यांच्या कर्तव्यनिष्ठ सेवेला मनापासून सलाम केला. समाजाची सुरक्षितता आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस बांधव अहोरात्र कार्यरत असतात. त्यांच्या या सेवाभावाची जाणीव ठेवून विद्यार्थिनींनी पोलीस ठाण्यात जाऊन राखी बांधल्याने पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्येही आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या उपक्रमातून 'रक्षण करणाऱ्या हातांप्रती कृतज्ञता' हा सामाजिक संदेश देण्यात आला.

या उपक्रमाचे आयोजन एस. एन. डी. इंटरनॅशनल सीबीएसई स्कूलचे चेअरमन मालोजीराजे देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्याध्यापक संदीप पानसरे, उप मुख्याध्यापक शकूर पटेल, पीआरओ मनोज राऊत, शिक्षिका वर्षा गुळीग यांच्या नियोजनात करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, संस्कार, कृतज्ञता आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी निर्माण व्हावी, या उद्देशाने शाळेच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहेत.

विद्यार्थिनींच्या या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे नातेपुते पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कौतुक केले.

# विश्वशांती गुरुकुलच्या विद्यार्थ्यांचे मूक-बधिर विद्यालयात रक्षाबंधन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचा सण असलेला रक्षाबंधन सोहळा यंदा सोलापूर येथील माईर्स एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत संवेदनशील आणि सामाजिक बांधिलकी जपत साजरा केला. समाजातील प्रत्येक घटकाला समानतेने आणि आपुलकीने सामावून घेण्याचा संदेश देत, गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी ह्याराधाकृष्ण फोमरा मूक-बधिर विद्यालया'तील विशेष मुलांसोबत रक्षाबंधनाचा आनंद द्विगुणित केला. माईर्स एमआयटी संस्थेच्या विश्वस्त व महासचिव प्रा. स्वाती कराड-चाटे यांच्या प्रेरणेतून आयोजित या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये परस्पर स्नेह, सहानुभूती आणि सर्वसमावेशकतेची भावना वृद्धिंगत करणे हा होता.



रक्षाबंधनानिमित्त गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी मूक-बधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रेमाची राखी बांधून त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलवले. कोणत्याही संवादाची किंवा शब्दांची गरज न भासता, केवळ भावनांच्या रेशमी धाग्याने दोन्ही विद्यालयांतील विद्यार्थ्यांमध्ये स्नेहाचे आणि आपुलकीचे बंध अधिक दृढ केले.

विद्यालयाच्या मुख्याध्यापिका रुपाली हजारे यांनी या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, "विद्यार्थ्यांना संवेदनशील, जबाबदार आणि सामाजिक भान असलेले उत्तम नागरिक घडवणे ही आपली जबाबदारी आहे. अशा उपक्रमांमुळे मुलांच्या मनात समाजातील प्रत्येक घटकाविषयी आदर व आपुलकीची भावना निर्माण होते."

# कुर्डूवाडी आगारात 'राजमाता जिजाऊ' पाच नव्या बसेसचे लोकार्पण

## आ. अभिजीत पाटील व आ. नारायण पाटील यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना यश

**कुर्डूवाडी (कटूसत्य वृत्त):-** कुर्डूवाडी एस.टी. आगारातील जुन्या व अपुऱ्या बसगाड्यांमुळे प्रवाशांना होणाऱ्या गैरसोयीची दखल घेत आमदार अभिजीत आबा पाटील यांनी परिवहन विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. आमदार नारायण आबा पाटील यांनीही यासाठी सातत्याने प्रयत्न केल्याने या सामूहिक पाठपुराव्याला यश आले असून, कुर्डूवाडी आगारात 'राजमाता जिजाऊ' नावाच्या पाच नव्या एस.टी. बसगाड्यांचे लोकार्पण मोठ्या उत्साहात संपन्न झाले.



या नव्या बसगाड्यांच्या स्वागतासाठी स्थानिक नागरिक, प्रवासी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्या बसगाड्यांचे आगारात आगमन होताच नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. सर्वसामान्य प्रवाशांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून केलेला पाठपुरावा सार्थकी लागल्याचे समाधान व्यक्त करण्यात आले.

नवीन बसगाड्यांमुळे दररोज प्रवास करणारे सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, महिला तसेच नोकरदार वर्गाला मोठा दिलासा मिळणार आहे. प्रवाशांना अधिक नियमित, सुरक्षित, आरामदायी आणि विश्वासार्ह एस.टी. सेवा उपलब्ध होण्यास मदत होणार असून, प्रवाशांची गरज लक्षात घेऊन भविष्यात बसफेऱ्यांमध्येही वाढ करता येणार आहे.

कुर्डूवाडी आगाराच्या विकासासाठी तसेच प्रवाशांना चांगली सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी दोन्ही आमदारांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे नागरिकांकडून स्वागत करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ नेते राजाभाऊ चवरे, हंबीरराव गोरे, शिवसेना महिला आघाडी जिल्हाप्रमुख सौ. आरती ओंकार बसवंती, संगीता ताई वरपे, तालुकाप्रमुख व उपजिल्हाप्रमुख रंजना शिंदे, ज्येष्ठ शिवसैनिक नंदकुमारजी मोरे, युवासेना शहरप्रमुख सागर कोले, पालक अधिकारी कौलगे साहेब, कुर्डूवाडी आगार व्यवस्थापक रत्नाकर लाड साहेब, वाहतूक निरीक्षक मंगेश दहीहंडी साहेब, आगार लेखाकार राजू नवले, कामगार सचिव प्रशांत देशमुख, संदीप शिंदे तसेच कर्मचारी वर्ग, कामगार संघटना व कामगार सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

कुर्डूवाडी आगाराला मिळालेल्या या पाच नव्या बसगाड्या प्रवाशांच्या सेवेत महत्त्वाची भर ठरणार असून, 'प्रवासी हित प्रथम' या भावनेतून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

# सिंहगड पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी नेत्र तपासणी अभियान

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याबरोबरच दृष्टीदोषांचे वेळीच निदान व्हावे, या उद्देशाने सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, केगाव, सोलापूर येथे शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालयाच्या सहकार्याने दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी विद्यार्थ्यांसाठी नेत्र तपासणी अभियानाचे आयोजन करण्यात आले. या अभियानांतर्गत डॉ. गायत्री कदम, डॉ. मोहित पठाण आणि डॉ. प्रियांका कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांची सर्वसमावेशक नेत्र तपासणी करण्यात आली. विद्यार्थ्यांची दृष्टी क्षमता तपासणे, संभाव्य दृष्टीदोषांचे निदान करणे तसेच डोळ्यांच्या आरोग्याबाबत आवश्यक मार्गदर्शन करणे यावर विशेष भर देण्यात आला.

मोबाईल, संगणक, स्मार्ट बोर्ड तसेच अन्य डिजिटल साधनांचा विद्यार्थ्यांकडून वाढता वापर लक्षात घेता डोळ्यांची योग्य काळजी घेणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांनी सांगितले. स्क्रीनकडे पाहताना योग्य अंतर राखणे, ठराविक वेळेनंतर डोळ्यांना विश्रांती देणे, पुरेशा प्रकाशाचा वापर करणे आणि संतुलित आहार घेणे याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.



या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नेत्र आरोग्याबाबत जागरूकता निर्माण झाली असून, नियमित नेत्र तपासणीचे महत्त्वही अधोरेखित झाले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी शाळेने राबविलेल्या या उपक्रमाचे पालक, विद्यार्थी आणि शिक्षकांनी कौतुक केले. या अभियानाचे यशस्वी आयोजन सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव तथा सिंहगड इन्स्टिट्यूट, केगाव, सोलापूरचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या प्रसंगी शाळेच्या प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, उपप्राचार्या निकहत शेख यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

नेत्र तपासणी अभियानासाठी सहकार्य केल्याबद्दल शंकरशेठ साबळे नेत्र रुग्णालयाच्या वैद्यकीय पथकाचे शाळेच्या वतीने आभार मानण्यात आले. विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने हे अभियान अत्यंत उपयुक्त ठरले.

# ईद-ए-मिलाद निमित्त रक्तदान शिबिर 111 रक्तदात्यांनी केले रक्तदान

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** ईद-ए-मिलाद म्हणजेच मोहम्मद पैगंबर यांच्या जयंती निमित्त मोहोळ शहरात विविध ठिकाणी सामाजिक उपक्रम राबवून साजरी करण्यात आली यामध्ये सनराइज बहुउद्देशीय सामाजिक संस्था संचलित सनराइज क्लबच्या वतीने नगरसेवक मुस्ताक शेख यांच्या संकल्पनेतून प्रभाग क्रमांक चार मधील बांधकाम कामगार शेतकरी मजूर या सर्व नागरिकांसाठी वैयक्तिक अपघात विमा पॉलिसी आणि रक्तदान शिबिर घेण्यात आले होते. या शिबिर चा शुभारंभ महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष माजी आमदार राजन पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. या रक्तदान शिबिरात 111 रक्तदात्यांनी रक्तदान केले. तर 150 नागरिकांचे वैयक्तिक अपघात विमा करण्यात आला आहे.

ईद-ए-मिलाद निमित्त मोहोळ शहरातून मुस्लिम समाज बांधवांनी एक जुलुस रॅली काढून विविध समाज बांधवांना सणाच्या शुभेच्छा दिल्या. जुलूस रॅलीमध्ये केक मिठाई आणि पाणी बॉटल चे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी उपस्थित पोलिस निरीक्षक दीपक पाटील उपनगराध्यक्ष दत्तात्रय खवळे नगरसेवक प्रमोद बापू डोके, सुशील भैया क्षिरसागर, संतोष सुरवसे, एजाज तलफदार, शकील शेख, उद्योजक खाजाभाई शेख, राजू सुतार, रफिक हरणमारे, इत्यादी सह प्रभागातील नागरिक उपस्थित होते

## सनराईज क्लब चा उपक्रम

## जुलूस मध्ये मिठाई आणि पाणी वाटप



ईद-ए-मिलाद निमित्त सनराइज क्लब परिवाराच्या वतीने अनावश्यक खर्च टाळून प्रभागातील नागरिकांसाठी वैयक्तिक अपघात विमा करण्याचा आमचा उद्देश होता त्या शिबिर मध्ये 150 लोकांनी सहभाग घेतला आणि रक्तदान हेच श्रेष्ठ दान आणि सद्यः स्थिति मध्ये असलेला अपुरा रक्तसाठा याचा विचार करून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी १११ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवत ही रक्तदान शिबिर यशस्वी केले. त्या सर्व विमाधारक आणि रक्तदात्यांचे खूप खूप आभार.

**मुस्ताक शेख,** मा. नगरसेवक तथा संस्थापक अध्यक्ष सनराईज क्लब

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हुजेफ शेख, शाहीद शेख, साकीब आतार, कय्युम शेख, मोईन शेख, जावेद बागवान, अजीम तांबोळी, साकीब शेख, सोयब शेख, अबिद शेख,आयाज शेख, निजाम लोहार, सुफियान शिकलकर, हरिष शेख, आयन तांबोळी, ईशान तांबोळी, सत्तार शेख, इंजमाम शिकलकर, मोईन शेख, अमन हारनमारे, समीर शेख इत्यादी सह सनराईज क्लब च्या सर्व सदस्यांनी परिश्रम घेतले.

# देवडेत आ. अभिजित पाटील यांचा 'मुक्काम'

## शेतकरी, वीज, रस्ते, पाणी प्रश्नांवर थेट चर्चा

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** 'आमदार मुक्कामी; आपल्या गावी' या अभिनव अभियानांतर्गत देवडे ता. पंढरपूर येथे मुक्काम करून आमदार अभिजीत आबा पाटील यांनी गावकऱ्यांशी थेट संवाद साधला.

गावातील नागरिकांच्या अडीअडचणी जाणून घेतानाच विविध विभागांच्या अधिकाऱ्यांना सोबत ठेवून अनेक प्रश्नांवर जागेवरच तोडगा काढण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यामुळे आमदारांच्या या उपक्रमाला देवडे ग्रामस्थांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या भागातील अनेक नागरिकांना शासकीय कामांसाठी वारंवार तालुका किंवा जिल्ह्याच्या प्रशासकीय कार्यालयात हेलपाटे मारावे लागतात. एखाद्या प्रश्नासाठी महसूल, पंचायत समिती, कृषी, महावितरण, आरोग्य, पोलीस अशा विविध विभागांकडे जावे लागते. त्यामुळे वेळ, पैसा आणि श्रम खर्च होऊनही अनेक प्रश्न प्रलंबित राहतात. ही अडचण लक्षात घेऊन 'आमदार मुक्कामी; आपल्या गावी' अभियानाच्या माध्यमातून सर्व संबंधित प्रशासकीय यंत्रणेलाच थेट गावात आणण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. देवडे येथेही तहसीलदार, पोलीस प्रशासन, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, ग्रामसेवक, तलाठी, कृषी अधिकारी, महावितरणचे अधिकारी तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी नागरिकांनी मांडलेल्या अनेक प्रश्नांवर संबंधित अधिकाऱ्यांशी थेट चर्चा करण्यात आली. काही समस्या जागेवरच मार्गी लावण्यात आल्या, तर काही प्रश्नांवर संबंधित विभागांना आवश्यक सूचना देऊन पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. काही नागरिकांना आवश्यक दाखले व प्रमाणपत्रांचे वितरणही करण्यात आले.




**'प्रश्नांसाठी लोकांनी माझ्याकडे नव्हे, मीच त्यांच्या दारी जाणार'**

राजकारणात लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्यातील थेट संवाद अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने हे अभियान राबविण्यात येत असल्याचे आमदार पाटील यांनी स्पष्ट केले. निवडणुकीच्या काळात मतांसाठी गावोगावी जाण्यापेक्षा पाच वर्षांच्या काळात नागरिकांच्या प्रश्नांसाठी त्यांच्या गावात जाणे आणि त्यांच्या समस्या समजून घेणे, ही लोकप्रतिनिधी म्हणून आपली जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. देवडे येथे या उपक्रमाला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाबद्दल ग्रामस्थ, सहकारी आणि उपस्थित प्रशासकीय अधिकाऱ्यांचे मनापासून आभार...

**- आमदार अभिजीत पाटील,** माढा विधानसभा मतदारसंघ

**शेतकरी, वीज, रस्ते अन पाण्यापासून घरकुलापर्यंत प्रश्नांचा पाढा**

देवडे येथील नागरिकांनी विविध प्रश्न आमदारांसमोर मांडले. यामध्ये शेतकऱ्यांच्या अडचणी, वीजपुरवठा, शेतजमिनींचे बांध, रस्ते, रेशन धान्य, पाणीपुरवठा, गावातील मूलभूत सुविधा, शाळा, घरकुल, आरोग्य सेवा, विविध शासकीय दाखले व प्रमाणपत्रे यांसह अनेक प्रश्नांचा समावेश होता. नागरिकांनी मांडलेल्या प्रत्येक प्रश्नाची माहिती घेऊन संबंधित अधिकाऱ्यांकडून वस्तुस्थिती जाणून घेण्यात आली. प्रशासन आणि नागरिक यांच्यामधील दरी कमी करून प्रश्नांची थेट सोडवणूक करण्याचा हा प्रयत्न असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

**गावकऱ्यांसोबत जेवण, उशिरापर्यंत हितगुज**

या अभियानाचा देवडे येथील हा दुसरा टप्पा असून, आमदार अभिजीत पाटील यांनी केवळ बैठकीपुरता कार्यक्रम न ठेवता गावातीलच मंडळींसोबत जेवण करून उशिरापर्यंत नागरिकांशी मनमोकळा संवाद साधला. गावकऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी होत त्यांच्या अडचणी जवळून समजून घेण्याचा प्रयत्न यावेळी करण्यात आला.

'गावकऱ्यांशी झालेली हितगुज, थेट संवाद साधण्याची मिळालेली संधी आणि एखादा प्रश्न मार्गी लागल्यानंतर नागरिकांच्या चेहऱ्यावर उमटणारे समाधान, हीच या अभियानाची खरी ऊर्जा आहे. त्यातूनच आणखी जोमाने काम करण्याचे बळ मिळते,' असे आमदार अभिजीत पाटील यांनी यावेळी सांगितले.

देवडे गावापुरतेच हे अभियान मर्यादित न ठेवता माढा विधानसभा मतदारसंघातील प्रत्येक गावात मुक्काम करून नागरिकांच्या समस्या समजून घेण्याचा निर्धार आमदार पाटील यांनी व्यक्त केला. गावात मुक्कामाच्या काळात प्रशासकीय अधिकारीही उपस्थित राहणार असून, नागरिकांच्या समस्या थेट ऐकून त्यावर तत्काळ कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला जात असुन ह्लप्रशासन गावाच्या दारीह्व या संकल्पनेला प्रत्यक्ष कृतीची जोड देण्याचा प्रयत्न या अभियानातून होत असल्याने मतदारसंघातील सर्व सामान्य जनतेतुन या अभिनव संकल्पनेचे स्वागत केले जात आहे.

# 'लाडक्या भावाला' पुन्हा मुख्यमंत्रीपदी पाहणे, हीच लाडक्या बहिणींची ओवाळणी - डॉ. ज्योती वाघमारे

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** रक्षाबंधनाचा पवित्र सण म्हणजे केवळ मनगटावर बांधला जाणारा राखीचा धागा नव्हे, तर भाऊ-बहिणीच्या प्रेम, विश्वास आणि जिव्हाळ्याच्या अतूट नात्याची जपणूक करणारा दिवस. याच भावनेतून शिवसेनेच्या राज्यसभा खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांनी रक्षाबंधनानिमित्त उपमुख्यमंत्री तथा शिवसेनाप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या मनगटावर राखी बांधून भाऊ-बहिणीच्या नात्याला भावनिक उजाळा दिला शिवसेनेत प्रवेश केल्यापासून दरवर्षी रक्षाबंधनाच्या दिवशी



डॉ. वाघमारे या एकनाथ शिंदे यांना राखी बांधतात. यावेळीही त्यांनी अत्यंत आपुलकीने राखी बांधत आपल्या भावना व्यक्त केल्या. शिंदे साहेबांनी मला सख्ख्या बहिणीप्रमाणे प्रेम आणि मान दिला. त्यांनी माझ्यावर विश्वास ठेवून मला संसदेत काम करण्याची संधी दिली राज्यसभेची खासदार झाल्याचा आनंद मोठा होता मात्र शिंदे साहेबांना राखी बांधताना मिळणारा आनंद त्याहूनही मोठा आहे, असे डॉ. वाघमारे म्हणाल्या. महिलांच्या सक्षमीकरणासाठी शिंदे यांनी घेतलेल्या निर्णयांचा उल्लेख करताना त्यांनी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना', मुलींच्या उच्च शिक्षणासाठी मोफत शिक्षण, 'लेक लाडकी' योजना, सरकारी कागदपत्रांवर आईचे नाव अनिवार्य करण्याचा निर्णय तसेच एसटी प्रवासात महिलांना ५० टक्के सवलत यांसारख्या उपक्रमांमुळे महिलांच्या आत्मविश्वासाला बळ मिळाल्याचे सांगितले. महाराष्ट्रातील लाखो महिलांसाठी एकनाथ शिंदे हे केवळ राजकीय नेते नाहीत, तर त्यांचे लाडके भाऊ आहेत महिलांच्या आयुष्यात सन्मान, आधार आणि स्वावलंबन निर्माण करणाऱ्या या लाडक्या भावाला पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदी पाहणे, हीच राज्यातील लाखो लाडक्या बहिणींची खरी ओवाळणी ठरेल, असा विश्वास डॉ. ज्योती वाघमारे यांनी व्यक्त केला.